# भारतातील राजकारणाचे बदलते स्वरुप आणि प्रादेशिक पक्ष

**करणसिंह राजेंद्र पाटील**

संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**सारांश :**

भारतातील केंद्रीय राजकारणात प्रादेशिक पक्षांना महत्त्व आले असून राष्ट्रीय पक्ष नेतृत्वांना प्रादेशिक नेत्यांशी व तेथील अस्मितेशी जुळवू घ्यावे लागत आहे. लोकशाहीत सत्तेसाठी साम-दाम-दंड-भेद या नीतिचा वापर होत आहे. शासकीय यंत्रणांचा राजकीय शस्त्र म्हणून उपयोग केला जात असल्याचे दिसून येते. सत्तेच्या राजकारणात पक्षांतर बंदी कायद्याची पायमल्ली होत आहे. राजकारणात नैतिकता घसरली आहे. त्यामुळे पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. भिन्न विचारधारा असणाऱ्या पक्षांची सत्तेसाठी आघाडी होत आहे. सध्या राजकीय पक्षांचा सामाजिक पाया शोधणे अवघड झाले आहे. सत्ता राखण्यासाठी सहकारी प्रादेशिक पक्षांना झुकते माप दिले जात आहे. केंद्रातील आघाडीचे राजकारणात प्रादेशिक पक्षांना मोठे महत्त्व प्राप्त झाल्याने भारतीय राजकारणाचे प्रादेशिकीकरण झाले आहे.

**प्रस्तावना :**

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक देश असून त्यानुसार त्रिस्तरीय लोकशाही पद्धत स्वीकारली आहे. देशाचा उपखंडीय आकार तसेच धर्म, वंश, भाषा, जात, प्रांत यामध्ये असणारी विविधता आणि भारतीय संघराज्यीय स्वरुप लक्षात घेऊनच संविधान निर्माणकर्त्यांनी बहुपक्ष पद्धतीचे अस्तित्व स्वीकारले आहे. १९५२ पासून सुरु झालेल्या पहिल्या निवडणूकीपासून ते सद्य:स्थितीपर्यंत भारतीय राष्ट्रीय निवडणूक ही जगातील सर्वांत मोठी निवडणूक प्रक्रिया राहिलेली दिसते. जगामध्ये सर्वांत जास्त पक्ष भारतात आहेत. भारतीय निवडणूक आयोगाच्या मार्च २०२४ च्या अहवालानुसार भारतामध्ये ६ राष्ट्रीय पक्ष, ७६ प्रादेशिक पक्ष व २७६४ नोंदणीकृत पक्ष आहेत. भारतातील राजकीय पक्षात प्रतिगामी किंवा पुरोगामी तसेच डावी अथवा उजवी विचारसरणी असलेले लोक कमी अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे डावे पक्ष, मध्यममार्गी पक्ष, उजवे पक्ष, जातीयवादी पक्ष, बिगर जातीयवादी पक्ष असे सर्व प्रकारचे पक्ष आहेत. देशाच्या विविधतेप्रमाणे पक्षीय विचारधारेमध्ये सुद्धा विविधता आढळते.

भारताने बहुपक्ष पद्धतीचा स्वीकार केला तरी राजकीय पटलावर १९५२ ते १९६७ या काळात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते त्याला काँग्रेस व्यवस्था असे म्हणतात. त्यानंतर १९६७ ते १९८९ या कालावधीत अनेक राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाच्या विरोधात अनेक प्रादेशिक पक्षांचा उदय झाला आणि केंद्रात काँग्रेस पक्ष व घटक राज्यात प्रादेशिक पक्ष असे द्वंदात्मक राजकारण देशात उभे राहिले. त्यानंतर १९८९ ते २०१४ या कालावधीत राजकारणामध्ये स्पर्धात्मक बहुपक्षीय प्रणाली उदयाला आली. यामध्ये कोणताही पक्ष स्वबळावर बहुमत प्राप्त करू शकला नाही. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर आघाडी सरकारे स्थापन झालीत. १९८९ नंतरच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व राष्ट्रीय, राज्य व स्थानिक या तीनही पातळीवर वाढलेले दिसून येते. १९८९ नंतरचे कोणतेही केंद्र सरकार राज्यपातळीवरील प्रादेशिक पक्षांच्या मदतीनेच सत्तेवर आले. त्यामुळे राज्यपातळीवरचे राजकारण हे देशाच्या केंद्रस्थानी झाले. यातूनच राष्ट्रीय पक्ष, राष्ट्रीय नेते, राष्ट्रीय मुद्दे व देशपातळीवरचे राजकारण यांनी राज्यांच्या राजकारणाला आकार देण्याची पद्धत मागे पडली व प्रादेशिक पक्षांना मोठे महत्त्व प्राप्त झाले. प्रादेशिक पक्ष, प्रादेशिक नेते व प्रादेशिक समीकरणे यातुनच अखिल भारतीय राजकारणाची दिशा ठरू लागली. त्यामुळेच प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढू लागले.

२०१४ आणि २०१९ च्या निवडणूकीमध्ये भाजपाला बहुमत प्राप्त झाले तरी पण भाजपाने मित्र पक्षांना सोबत घेऊनच सत्ता स्थापन केली. काँग्रेसनंतर बहुमत प्राप्त करणारा भाजपा हा दुसरा पक्ष ठरला. त्यानंतर झालेल्या २०२४ च्या निवडणूकीमध्ये सर्वात जास्त जागा मिळवलेल्या भाजपाला बहुमत प्राप्त करता आले नाही. अनेक राज्यांत प्रादेशिक पक्षांनी दमदार जागा प्राप्त केल्या. परिणामी सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपाला प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा घ्यावा लागला. त्यामध्ये प्रामुख्याने जनता दल संयुक्त, तेलगु देसम या प्रादेशिक पक्षांच्या पाठिंब्याचा समावेश होता.

**उद्दीष्ट्ये :**

१) भारतातील बदलत्या राजकारणाचा प्रादेशिक पक्षांवर झालेला परिणाम अभ्यासणे.

२) प्रादेशिक अस्मितते झालेल्या विस्तृतीकरणाचा आढावा घेणे.

३) पक्षांतरबंदी कायदा आणि प्रादेशिक पक्ष यांचा सहसंबंध अभ्यासणे.

४) राजकारणातील नैतिक दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

५) प्रादेशिक पक्ष आणि आघाडी राजकारण यांचा आढावा घेणे.

६) केंद्रीय राजकारणातील प्रादेशिक पक्षांचे महत्त्व अभ्यासणे.

**व्याप्ती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतातील राजकारणाचे बदलते स्वरूप आणि केंद्रीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे वाढते प्राबल्य यांचा आढावा घेणे. तसेच प्रादेशिक पक्षांच्या संदर्भातील केंद्रीय राजकारणाचा अभ्यास करणे ही व्याप्ती आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्ततु शोधनिबंधाकरिता विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनांचा आधार घेतलेला आहे. त्यामध्ये प्रादेशिक पक्षांचे मुखपत्र तसेच संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र आणि संकेतस्थळ यांचा समावेश आहे.

**प्रादेशिक अस्मितेचे राजकारण :**

प्रादेशिक पक्ष तसेच प्रादेशिक नेते विविध मतप्रवाहांचे प्रतिनिधीत्व करतात त्यामुळे लोकशाही अधिक व्यापक झालेली दिसते. त्याउलट सध्या व्यक्ती व समुहांमध्ये अस्मितेच्या भावना तीव्र होत आहेत त्यामुळे व्यक्ती स्वत:च्या अस्तित्वाला दुय्यम मानून प्रादेशिक अस्मितेला प्रथमत: स्थान देत आहे.त्याचा परिणाम व्यक्ती आणि समूह यांच्यातील संतुलनात दुरावा झालेला दिसतो. भारतामध्ये व्यक्ती समुहातील अन्याय व विषमता हे बहुतेकदा नवीन अस्मितेच्या उदयास कारणीभूत ठरतात. त्यांना प्रतिक्रीया म्हणून अनेक अस्मिता निर्माण होत आहेत. अस्मितेचा मुद्दा बहुतांशी धर्माशी जोडला जातो. कारण बहुतांश व्यक्ती हे निवडणूकीत मतदान करताना कोणता उमेदवार आपल्या भाषिक, धार्मिक, जातीय अथवा अन्य अस्मितेशी जोडला गेला आहे हे पाहूनच मतदान करतो.

प्रादेशिक अस्मितेला संघराज्य व्यवस्थेतील घडणाऱ्या राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात महत्त्व वाढत आहे. प्रादेशिक नेत्यांसोबतच आता राष्ट्रीय नेतेसुद्धा ज्या त्या राज्यांमध्ये प्रचारास जाताना त्यांच्या स्थानिक भाषेत बोलणे तसेच तेथील स्थानिक पेहराव परिधान करणे या बाबींशी जुळवून घेत आहेत. परिणामी तेथील लोकसमूह हा आकर्षिला जातो व त्याचे रूपांतर मतदानामध्ये पक्षाला भरघोस मत मिळण्यामध्ये होते. अशा छोट्या-छोट्या प्रतिकात्मक बाबींमधूनही प्रादेशिक अस्मिता व्यक्त होत असते.

केंद्र सरकार अनेक राज्यांमध्ये तेथील होऊन गेलेले महापुरुष तसेच दिव्यवलयांकित नेतृत्व यांना मृत्युनंतर भारताचे सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करून तेथील त्या महापुरुषांशी अथवा नेतृत्वांशी संबंधित समुदायातील मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करते. अनेकवेळा सरकारी योजना किंवा महामंडळाची निर्मिती देखील प्रादेशिक अस्मितेच्या म्हणजेच जात, धर्म तसेच भाषेकरीता केलेली आढळते.

आपल्या समाज व्यवस्थेमध्ये शेवटच्या घटकापर्यंत लोकशाहीची राजकीय तत्त्वे पोहचली नाहीत त्यामुळे समाजव्यवस्था अस्मितेच्या राजकारणामुळे लोकशाहीवर मर्यादा लादताना दिसते.

**लोकशाहीत साम-दाम-दंड-भेद नीति :**

आचार्य चाणक्य यांच्या अर्थशास्त्र ग्रंथातील या नीतिचे तत्कालीन राजकारणापासून सध्यकालीन राजकारणातील वास्तविक स्वरुप म्हणजेच साम-दाम-दंड-भेद नीति होय. साम म्हणजे समजावून सांगून, दाम म्हणजे पैसे देऊन, दंड म्हणजे शक्तीचा किंवा बळाचा वापर करुन आणि भेद म्हणजे भीती दाखवून अथवा फूट पाडून अशा प्रकारे राष्ट्रीय पक्ष तसेच काही ठिकाणी प्रादेशिक पक्ष निवडणूकीपूर्वी निवडुन येणाऱ्या उमेदवाराला आपल्या पक्षात घेतात. तर काही वेळा निवडणूकीनंतर देखील या नीतिचा वापर करून इतर पक्षांचे लोकप्रतिनिधी फोडण्याचे काम केलेले आढळते. सत्तेतील सरकार अनेकदा विरोधी पक्षाला लक्ष्य करण्यासाठी ईडी, सीबीआय सारख्या संस्थांचा राजकीय वापर करताना दिसतात असे आरोप वारंवार होत आहेत. सीबीआय ची स्थापना झाली तेव्हा ती एक निष्पक्ष आणि जलदगतीने तपास करणारी संस्था म्हणून ओळखली जात होती पण ७० च्या दशकापासून ते आजपर्यंत तिचा वाढलेला गैरवापर पाहता त्यास विरोधीपक्षाविरोधात वापरले जाणारे राजकीय शस्त्र अशी जनप्रतिमा निर्माण होत आहे.

भारतातील निवडणूकांमध्ये घराणेशाहीला विशेष प्राधान्य असल्याचे दिसते. सध्याच्या राजकारणात तत्वे, निष्ठा, विश्वासार्हता बाजूला पडली आहे. प्रस्थापित राजकारणी आपल्या घराण्यातील वारसास पुढे करून निवडणूका जिंकत आहेत. घराणेशाही बाबत कोणी कितीही आरोप केले तरी राजकारणात प्रस्थापितांची घराणेशाही असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतात अनेक पक्षांतील कार्यकर्ते (पक्षाचे नोंदणीकृत सदस्य) हे वरिष्ठ नेत्यांच्या या नीतिच्या वापरामुळे कार्यकर्तेच राहत आहेत. त्यासाठी भारतातील पक्ष पद्धतीत पक्ष प्रवेश, पदोन्नती याबाबत कोणतेही स्पष्ट नियम अथवा धोरणे कोणत्याच पक्षात अस्तित्वात नाहीत. त्यामुळे काही वेळेस पदांच्या लालसे पोटी या नीतिचा वापर करुन अनेक पक्ष दुसऱ्या पक्षातील नेते तसेच प्रमुख कार्यकर्ते यांना आपल्या पक्षात सामील करताना दिसतात.

**सत्तेसाठी पक्षांतरबंदी कायद्याला तिलांजली :**

१९६६ ते १९७२ या काळात पक्षांतराचा सुळसुळाट झाला होता. त्यामुळे अनेक राज्य सरकार अस्थिर झालेली होती. १९८५ पूर्वी कोणत्याही सदनातील लोकप्रतिनिधीने कोणत्याही पक्षात कधीही प्रवेश करु शकत होते आणि त्यांचे त्या सदनाचे सदस्यत्व रद्द होत नव्हते. १९६७ साली हरियाणातले आमदार गया लाल यांनी एका दिवसात तीनदा पक्ष बदलला तेव्हा पासून 'आयाराम गयाराम' ही म्हण प्रचलित झालेली दिसते.

पक्षांतर म्हणजे एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याची प्रक्रिया होय. सत्तेसाठी अथवा हितसंबंधाच्या राजकारणातून कुणीही कसेही पक्षांतर करु शकतात. त्यामुळे पक्षांतरावर निर्बंध आणण्यासाठी १९८५ च्या ५२ व्या घ. दु. ने राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारने पक्षांतर बंदी कायदा आणला. या कायद्याचा मुख्य उद्देश असा होता की आपल्या सोयीप्रमाणे पक्ष बदलणाऱ्या आमदार आणि खासदारांवर नियंत्रण ठेवता यावे. पण या कायद्यामध्ये एक अपवाद होता जर कोणत्याही पक्षाचे दोन तृतीयांश आमदार किंवा खासदार दुसऱ्या पक्षात जात असतील तर त्यांचे सदस्यत्व रद्द होत नाही.

राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचीच्या ६ व्या परिच्छेदानुसार लोकप्रतिनिधींना अपात्र ठरवण्याचा तसेच त्यांच सदस्यत्व रद्द करण्याचा अंतिम अधिकार हा विधानसभेते अध्यक्षांना तर लोकसभेत सभापतींना असतो. तसेच ७ व्या परिच्छेदात नमूद केलेले आहे की न्यायालय या निर्णयात हस्तक्षेप करू शकत नाही. मागील काही वर्षांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, यांसारख्या मोठ्या राज्यांचा तसेच गोवा, झारखंड, मणिपूर अशा लहान राज्यांमध्ये ज्या काही पक्षांतराच्या घटना घडल्या त्या पाहता सत्ताकारणाच्या राजकारणामध्ये पक्षांतर बंदी कायद्याची झालेली पायमल्ली लक्षात येते. राजकीय पदांसाठी किंवा इतर तत्सम विचारांमुळे होणारे राजकीय पक्षांतर रोखण्यासाठी तसेच राजकारणातील घसरलेली नैतिकता पाहता पक्षांतरबंदी कायद्यामध्ये सद्य:स्थितीला सुधारण्याची आवश्यकता आहे.

**भिन्न विचारधारा असणाऱ्या पक्षांची आघाडी :**

अनेक राजकीय प्रादेशिक पक्ष सत्तेसाठी आपल्या राजकीय विचारधारेशी फारकत घेऊन सत्तेमध्ये सहभागी होताना दिसतात. भारतातील राजकीय पक्षात प्रतिगामी किंवा पुरोगामी तसेच डावी अथवा उजवी विचारसरणी असलेले लोक कमी अधिक प्रमाणात आहेत. यावर आधारित पक्षांची भूमिका अनेक बाबतीत बदलत असते. पूर्वी भारतातील राजकीय पक्षांची विचारधारा ही त्या पक्षाच्या प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावरील भूमिकेवरून निश्चित करता येत होती परंतु सद्यःस्थितीत ठराविक पक्ष सोडल्यास विचारधारेवर आधारित राजकीय पक्षांचे वर्गीकरण करणे भारतीय राजकारणात काहीसे अवघड झालेले आहे. परिस्थितीतनुसार विचारधारेतील तफावतीनुरूप पक्षांतरे व पक्षफुटी घडत असतात. त्यामुळे येथील राजकीय पक्षांचा सामाजिक पाया शोधणे अडचणीचे बनते.

**प्रादेशिक पक्षांना केंद्रस्थानी ठेवून निर्णयाची दिशा :**

२० व्या शतकाच्या अखेरच्या दशकात अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष सत्तेवर आले. तसेच केंद्रीय सत्तेमध्ये देखील पंतप्रधान व मंत्रीमंडळ ठरवण्यामध्ये महत्त्वाची भुमिका पार पाडू लागले. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचा नकाराधिकाराला निर्णायक स्वरुपाचे महत्त्व आले. तेव्हापासूनच आजपर्यंत कोणतेही केंद्र सरकार प्रादेशिक पक्षांच्या मदतीनेच सत्तेवर आले व राज्यपातळीवरचे राजकारण देशाच्या राजकारणाला दिशा देऊ लागले. प्रादेशिक पक्ष राज्याच्या हितसंबंधाला प्राधान्य देऊन दिल्लीच्या केंद्रीय राजकारणात हस्तक्षेप करू लागले. त्यामुळेच केंद्रातील सत्तेतील पक्ष सोबतच्या आघाडीतील प्रादेशिक पक्षांना केंद्रस्थानी ठेवून निर्णयाची दिशा ठरवू लागले. त्याचप्रमाणे पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण यांसारखे किताब केंद्र सरकार देत असले तरी त्यासाठीच्या शिफारशी राज्य सरकारकडून पाठवल्या जातात. केंद्रीय सत्तावाटपातील सहकारी प्रादेशिक पक्षांतील वरिष्ठ नेत्यांना त्या पक्ष नेतृत्वाच्या शिफारशीनुसार 'राज्यपाल' पदासारखे केंद्र-राज्य समन्वयासाठी असणारे संविधानिक पद देण्याची परंपरा आजपर्यंत सुरु असलेली दिसते.

केंद्रीय कायदेनिर्मितीमध्ये काही वेळेस सत्तेतील सहभागी प्रादेशिक पक्षांचा हस्तक्षेप आढळतो. प्रादेशिक पक्ष आपआपल्या राज्याच्या अनुकूलतेचा विचार करुन विधेयक निर्माण करण्यास केंद्र सरकारला भाग पाडतात. तसेच अनेकदा प्रादेशिक पक्षांच्या विरोधामुळे विधेयकांतील तरतुदी बदलाव्या लागलेल्या आहेत.

**अर्थकारणामुळे झालेले प्रादेशिक पक्षांचे समायोजन :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्व समान व कायद्याचे सर्वांना समान संरक्षण याप्रमाणे सत्तेमध्ये सहभागी नसणाऱ्या प्रादेशिक पक्षांना निधीवाटपाबाबत केंद्रसरकारकडून दुय्यम स्थान दिले जात आहे. त्यामुळे अनेक प्रादेशिक पक्ष आपल्या राज्यांच्या विकासासाठी भरीव निधी मिळावा यासाठी सत्तेतील पक्षासोबत आघाडीचे राजकारण

करताना दिसतात व सत्तेतील पाठिंब्याच्या बदल्यात महत्त्वाची मंत्रीपदे तसेच मोठ्या प्रमाणात निधी मिळवून घेत आहेत. भिन्न विचारधारेतील प्रादेशिक पक्ष देखील विकास निधीसाठी सत्तेमध्ये सहभागी होत असतात. त्यानुसार केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये विशिष्ठ राज्यांकरीता भरीव आर्थिक तरतूद केलेली पहावयास मिळते.

केंद्रसरकार हे आर्थिक निर्णयांचे केंद्र असले तरी वित्तीय संघराज्यामुळे आर्थिक बाबतीत अधिकाराची विभागणी राज्यघटनेनुसार केंद्र-राज्य यांमध्ये झालेली आहे. कररूपाने जमा होणारा महसूल केंद्र सरकार राज्यांमध्ये वाटप करत असते. परंतु त्यामध्ये पक्षपात केला जातो. म्हणून राज्ये ही केंद्र सरकारच्या निधीवर अवलंबून असतात. त्यामुळेच अर्थकारणाच्या वाटपामुळे केंद्र-राज्य संबंधांमध्ये संघर्ष होत असतो.

बहुराष्ट्रीय उद्योगांची गुंतवणूक आपल्या राज्यात होण्यासाठी सर्वच प्रादेशिक पक्ष प्रयत्न करतात म्हणून उद्योगांना सवलती व सुविधा देण्याची स्पर्धाच राज्यांमध्ये सुरु असलेली दिसते. परंतु केंद्र सरकारच्या कर दहशतवादामुळे अनेक उद्योजक आपले प्रकल्प केंद्रसरकारच्या मर्जीनुसार सत्तेमध्ये सहभागी असणाऱ्या प्रादेशिक पक्षांच्या राज्यामध्ये सुरु करत असल्याचे तसेच दुसऱ्या राज्यातून प्रकल्पांचे स्थलांतर करत असल्याचेसुद्धा पहावयास मिळते. केंद्र सरकार अनेक राज्यांमध्ये तेथे होऊन गेलेल्या महापुरुषांची स्मारके, विशिष्ठ समुदायांचे प्रार्थनास्थळे यांना भरघोस निधी देऊन प्रादेशिक अस्मितेचे राजकारण करते.

**भारतीय राजकारणाचे झालेले प्रादेशिकीकरण :**

भारतामध्ये प्रादेशिक पक्षांचा उदय हा विविध धर्म, जाती, भाषा, प्रांत तसेच प्रादेशिक अस्मितेतून झालेला आहे. प्रत्येक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष असले तरी बहुविविधतेमुळे प्रादेशिक पक्ष निर्माण होण्याची कारणे राज्यांनुसार वेगवेगळी आहेत. काही राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष हे राष्ट्रीय पक्षांमध्ये प्रभावी असलेले पहावयास मिळते. तसेच अनेक राज्यांमध्ये राष्ट्रीय पक्षांना काहीच स्थान नसून फक्त प्रादेशिक पक्षांमार्फतच तिथले राजकारण चालते.

१९९० नंतर देशातील अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष सत्तेवर आले तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने प्रादेशिक पक्षांचे केंद्रीय राजकारणातील महत्त्व वाढीस लागले प्रादेशिकीककरणाबाबतच्या छोट्या-छोट्या घडणाऱ्या राजकीय घडामोडींचे परिणाम फक्त प्रदेशापुरते मर्यादित न राहता प्रदेशांच्या वेगळेपणाचे राजकारण असे नवे समीकरण उदयास आले. ज्यामुळे त्यानंतरच्या निवडणूकांमध्ये मतदार प्रादेशिक नेते आणि प्रादेशिक पक्ष यांचा विचार प्रामुख्याने करूनच मतदान करू लागले. त्यामुळेच १९८९ ते २००९ यामध्ये झालेल्या निवडणूकीत कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त झाले नाही. संघराज्य व्यवस्थेमध्ये घडणाऱ्या राजकारणात प्रादेशिक भावना आणि प्रादेशिक अस्मिता यांचे प्राबल्य वाढलेले आहे. प्रादेशिक नेतृत्वांचा प्रादेशिक महत्त्वाकांक्षांच्या राजकारणामुळे त्यांच्या भावनिक आवाहनाचा परिणाम जनतेवर होऊन राष्ट्राभिमानापेक्षा प्रादेशिक अभिमानाची भावना वाढीस लागली आणि लोकशाहीत पेचप्रसंगाची वाढ झाली. १९८९ नंतर केंद्र सरकारच्या निर्मितीमध्ये प्रादेशिक पक्ष हे मध्यवर्ती घटक राहिलेले आहेत. भारतीय राजकारणाचे प्रादेशिकीककरण झाल्याने यापुढील निवडणूकांमध्ये देखील राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष या दोघांच्या तडजोडीतूनच भारतातील केंद्रीय राजकारण चालू राहील असे स्पष्ट दिसत आहे.

**निष्कर्ष :**

१) प्रादेशिक पक्षांमुळेच भारतातील राजकारणामध्ये बदल होताना दिसतो.
२) प्रादेशिक अस्मितेमध्ये नवीन समीकरणांचा समावेश झालेला दिसून येते.
३) पक्षांतरबंदी कायद्यातील अपवादात्मक बाबींचा प्रादेशिक पक्ष गैरफायदा घेताना आढळतात.
४) राजकारणातील नैतिक पातळीचा स्तर खालावलेला दिसून येतो.
५) अनेक प्रादेशिक पक्ष विरोधी विचारधारा असणाऱ्या पक्षांसोबत सत्तेसाठी आघाडी करत असल्याचे दिसते.
६) केंद्रीय राजकारणामध्ये प्रादेशिक पक्ष मध्यवर्ती घटक असल्याचे आढळते.

**संदर्भ :**

१) पळशीकर सुहास, (२०१३), 'राजकारणाचा ताळेबंद', साधना प्रकाशन, पुणे.
२) भोळे भास्कर, (२००३), 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
३) Hasan Zoya, (2002), 'Politics and the State in India', Sage Publications, New Delhi.
४) Jayal Niraja, Mehta Pratap, (2010), 'The Oxford Campanion to Politics in India', Oxford University Press, New Delhi.
५) www.thehindu.com